UGC Care Listed Journal

ISSN-0976-5425

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद

# History Research Journal

Issue - XXVIII

# इतिहास संशोधन पत्रिका

अंक अठ्ठावीसावा





कार्यकारी संपादक

डॉ. सोमनाथ रोडे

Scanned by CamScanner

UGC Care Listed Journal

**मराठवाडा इतिहास परिषद,**
**औरंगाबाद**
(रजि.नं. एफ ८२० / दि. २६.०८.१९८२)

**ISSN : 0976 – 5425**

# History Research Journal
# इतिहास संशोधन पत्रिका

**Issue. - XXVIII** **May**
अंक - अठ्ठावीस 2022

कार्यकारी संपादक
**डॉ. सोमनाथ रोडे**

**: संपादकीय मंडळ :**

डॉ. जाकेर पठाण प्रा. विजय पांडे
डॉ. सुभाष बेंजलवार डॉ. नारायण सूर्यवंशी
डॉ. प्रभाकर मिरकड डॉ. विनोद बोरसे
डॉ. बब्रुवान मोरे

या अंकात व्यक्त केलेली विचार-मते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद अथवा संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

UGC Care Listed Journal

**History Research Journal**

**इतिहास संशोधन पत्रिका**

**Issue. - XXVIII May**

अंक - अठ्ठावीस 2022

**ISSN : 0976 – 5425**

☼ **प्रकाशक :**

**प्रा. विजय पांडे**

सचिव, मराठवाडा इतिहास परिषद

श्री संत सावता माळी महाविद्यालय, फुलंब्री

जि. औरंगाबाद, भ्रमणध्वनी - ९४२२७ २३२७७

☼ **मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद**

☼ **संपर्क :**

**प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे**

कार्यकारी संपादक

४ - शारदानगर, अंबाजोगाई रोड, लातूर

पीन : ४१३ ५३१ फोन : ०२३८२ - २२८०९०.

भ्रमणध्वनी : ९४२१४ ८३६११, ७५१७९ ८५६९०

☼ **मुखपृष्ठ छायाचित्रे** - शिवप्रसाद डिझायनर्स, लातूर

☼ **मूल्य : रु. २००/-**

पंचवार्षिक वर्गणी रु. १,०००/-

दशवार्षिक वर्गणी रु. २,०००/-

☼ **प्रकाशन दि. ०१ मे २०२२**

☼ **अक्षर जुळवणी व मुद्रक :**

**विद्याभारती प्रकाशन**

गुजराती शाळेजवळ, मेन रोड,

लातूर - ४१३ ५१२

The publication of the MSS/ Journals/Proceedings- financially supported by the Indian Council of Historical Research and the responsibility for the facts, stated, options expressed and conclusion researched is entirely that of the author/ authors of the articles and the Indian Council of Historical Research accepts no responsibility for them.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शीर्षक |
|---|---|---|---|

कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर येथे संपन्न झालेल्या ४० व्या अधिवेशनातील

**डॉ. एस. एस. गाठाळ**

**यांचे बीजभाषण**

## आधुनिक विभाग


| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शीर्षक |
|---|---|---|---|
| १. | Smt. Sweta Pandey | २५ | Tibetan Buddhist in India |
| २. | डॉ. सुभाष बेंजलवार | ३३ | महर्षि वि. रा. शिंदे आणि शेतकरी चळवळ |
| ३. | डॉ. ओमशिवा लिगाडे | ४१ | ऐतिहासिक संशोधन आणि तळटीपा |
| ४. | डॉ. गिरीधर सोमवंशी | ४७ | इतिहास आणि साहित्य संबंध |
| ५. | डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी | ५२ | मराठवाड्यातील अवयवदान चळवळ : एक अभ्यास |
| ६. | प्रा. सर्जेराव चांगदेव बनसोडे | ६० | स्त्रीवादी परिप्रेक्षातून हैद्राबाद मुक्ति-संग्रामाच्या इतिहास लेखनाचे अवलोकन |
| ७. | श्री. भुजंग रामराव बोबडे | ६६ | जळगाव जिल्ह्यातील वस्तुसंग्रहालये व वैयक्तिक संग्रहांचा वारसा |
| ८. | डॉ. सुरेश किशन भदरगे | ७४ | शहीद भगतसिंह - सशस्त्र और सामाजिक क्रांति के प्रणेता |
| ९. | डॉ. बाबासाहेब केशवराव शेप | ८० | अंबाजोगाईच्या शैक्षणिक कार्यात बाबासाहेब परांजपे यांचे योगदान |
| १०. | कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे | ८६ | यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आंदोलने |
| ११. | डॉ. मनोहर सुबराव कोळसेकर | ९३ | कोल्हापूर राज्यातील सामानगडच्या गडकऱ्यांचा उठाव |
| १२. | डॉ. सुरेश प्रसाद पाण्डेय | १०० | आचार्य नरेन्द्र देव जी के इतिहास लेखन और चिन्तन की दृष्टी (काशी विद्यापीठ के सन्दर्भ में) |




Scanned by CamScanner

## २

# महर्षि वि. रा. शिंदे आणि शेतकरी चळवळ

**डॉ. सुभाष बेंजलवार**
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, जि. लातूर

महर्षि वि.रा. शिंदे यांनी विसाव्या शतकात समाजसुधारणेच्या क्षेत्रात विशेषत: अस्पृश्यता निर्मूलनाच्या क्षेत्रात अतुलनीय असे कार्य केले. त्यांच्या या कार्यामुळेच कर्मवीर व महर्षि यांसारख्या उपाध्यांनी त्यांचा गौरव केला जातो. महर्षिंची आपण स्वीकारलेल्या कामाबद्दल प्रचंड अशी आत्मीयता व तेवढीच ते काम पूर्णत्वास नेण्याची तळमळ असे. एवढेच नव्हे तर सामाजिक प्रश्नांच्या मुळाशी जाऊन ते विचार करीत असत. अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य व त्यासाठी स्थापन केलेली डिप्रेस्ड क्लासेस मिशन ऑफ इंडिया यामुळे त्यांचा परिचय सबंध महाराष्ट्राला आहेच; परंतु त्यांचे विचार व कार्य एवढ्यापुरतेच मार्यादित नव्हते तर सामाजिक विषयासोबतच धर्म तत्त्ववेत्ते म्हणूनही त्यांची ख्याती होती. याशिवाय त्यांनी राजकीय स्वातंत्र्यासाठीच्या चळवळींतही हिरीरीने सहभाग घेतला होता. याशिवाय राजकीय चळवळ गतिमान झाली असतानाच शेतकरी परिषदांच्या मंचावरून शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम महर्षि शिंदे यांनी मोठ्या प्रमाणात केले हो[illegible]. महर्षि वि.रा. शिंदे यांचे शेतकरी चळवळ जागृतीचे कार्य हे केवळ त्यांना स्वा[illegible]त्र्य लढ्यात सामील करवून घेण्यापुरते मर्यादित नव्हते तर त्यांच्यामध्ये आपल्या प्रश्नांच्या अनुषंगाने आत्मभान निर्माण करणारे होते. त्यांनी ठिकठिकाणी शेतकरी परिषदांमधून शेतकरी संघटनांची आवश्यकता मोठ्या प्रमाणात प्रतिपादन केली. त्याम[illegible]ळे शेतकऱ्यांना त्यांच्या प्रश्नांसाठी स्वत: संघटित होण्यासाठी प्रेरित करणारे त्यांचे हे कार्य आजही दुर्लक्षित आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून शेतकरी चळवळीत आत्मभान निर्माण करण्यासाठी महर्षि वि.रा. शिंदे यांनी केलेल्या विचार व कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



Scanned by CamScanner

महर्षि वि.रा. शिंदे यांच्यापूर्वी शेतकरी प्रश्नांच्या अनुषंगाने सर्वप्रथम महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दल व शोषणाबद्दल मूलगामी मांडणी केली होती. शेतकऱ्यांची दैन्यावस्था होण्यासाठी जी अनेक कारणे होती त्यांपैकी काही कारणांचा ऊहापोह प्रस्तुत ग्रंथात महात्मा फुले यांनी केला होता. "शूद्र शेतकरी बनावट व जुलुमी धर्माच्या योगाने एकंदर सर्व सरकारी खात्यांनी ब्राह्मण कामगारांचे प्राबल्य असल्याने भटभिक्षुकांकडून व सरकारी यूरोपीयन कामगार ऐषोरामी असल्याचे योगाने, ब्राह्मण कामगारांकडून नडले जातात"[१] म्हणून महात्मा फुलेंनी शेतकरी वर्गात जागृती घडवून आणण्याच्या हेतूने हा ग्रंथ लिहिला. याशिवाय शेतकरी सभा व परिषदांमधून शेतकऱ्यांना जागृत करण्याचे काम महात्मा फुलेंनी केले होते. त्याचप्रमाणे शेतकरी परिषदांमधून महर्षि वि.रा. शिंदेंनी शेतकऱ्यांना त्यांची हलाखीची स्थिती दाखवून देऊन त्यावर मात करण्याचे उपाय सुचविले होते. महात्मा गांधींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होत असताना प्रथमत: शेतकरी आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी खेडा, चंपारण्य या ठिकाणी चळवळी केल्या. महात्मा गांधींमुळे राष्ट्रीय चळवळीत शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात सहभागी झाला होता. या पार्श्वभूमीवर महर्षि वि.रा. शिंदेंनी शेतकरी वर्गात जागृती करण्याचे काम केले.

महर्षि वि.रा. शिंदे स्वत: शेतकरी समुदायातील होते. त्यांचा जन्म जमखंडी (कर्नाटक) येथे २३ एप्रिल १८७३ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. शिंदे कुटुंब मूळचे महाराष्ट्रातलेच त्यांचे पणजोबा लढाईत कामी आल्यानंतर आजोबा बसाप्पा यांचा सांभाळ जमखंडी संस्थानातील एका लिंगायत देसायाने केला. "आजोबा बसाप्पा यांनी मोठेपणी शेतीबाडी मिळवून जमखंडीत नाव कमावले."[२] यावरून महर्षि वि.रा. शिंदे हे शेतकरी कुटुंबात जन्माला आले होते. त्यामुळे त्यांना शेती व्यवसायाची स्थिती आणि गती याबद्दलची चांगली जाणीव होती. या जाणीवेतून त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताची भूमिका मांडली व त्यांचे शत्रू कोण आहेत याचेही त्यांनी यथायोग्य विश्लेषण केले. यासाठी त्यांनी इ. स. १९२६ ते १९३२ या काळात विविध शेतकरी परिषदांमध्ये सहभाग घेतला. "अस्पृश्यांची शेतकी परिषद पुणे (१९२६), मुंबई इलाखा शेतकरी परिषद पुणे (१९२८), वाळवे तालुका शेतकरी परिषद बोरगाव (१९३१), संस्थानी शेतकरी परिषद तेरदाळ (१९३२) व चांदवड तालुका शेतकरी परिषद वडनेर (१९३२)"[३] या पाच शेतकरी परिषदांमध्ये भाग घेऊन महर्षि वि.रा. शिंदे यांनी शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्याचे मोलाचे कार्य केले.



Scanned by CamScanner

पुणे येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या शेतकी परिषदेत बोलताना म्हणतात की, "शेतकीचा प्रश्न हा अर्थशास्त्राचा आहे. अस्पृश्यतेचा प्रश्न हा सामाजिक, धार्मिक व विशेषत: राजकीय जुलुमाचा आहे."[४] अस्पृश्यांनी शेतकीच्या प्रश्नापेक्षांही अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे प्राधान्य द्यावे. त्यासाठी सामाजिक शिक्षण परस्पर सहकार्याचे हितसंबंध महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले. शेतकरी कोण? याबद्दल महर्षि वि.रा. शिंदे यांनी आपली भूमिका वाळवे तालुका शेतकरी परिषद, बोरगाव या ठिकाणी व्यक्त केली. ते म्हणतात की, "माझ्या मते शेतकरी म्हणजे तोच, की जो आपल्या कुटुंबाच्या व आश्रितांच्या पोषणाला, शिक्षणाला आणि योग्य त्या सुख-सोयींना आवश्यक इतकीच आणि आपल्या आप्तांकडून व आश्रितांकडून वाहवेल इतकीच जमीन बाळगतो आणि ती आपण स्वत: आपल्या आप्तांच्या व आश्रितांच्या श्रमाने योग्य रीतीने खरोखर वाहतो."[५] असे न करता जे जमीन मालक अथवा स्वत:ला शेतकरी म्हणतात ते शेतकरी नसून ते शेतकऱ्यांचे प्रतिस्पर्धी आहेत. अशी शेतकरी म्हणजे कोण या प्रश्नाची महर्षि वि.रा. शिंदे यांनी व्याख्या केली.

**तुकडेबंदी व सारावाढीचे बिल :-**

सन १९२८ मध्ये मुंबई सरकारने महसूल खात्याचे दिवाण सर चुनीलाल मेहता यांच्या प्रेरणेने तुकडेबंदी व सारावाढीचे विधेयक मुंबई कौन्सिलात आणले होते. "तुकडेबंदीच्या विधेयकानुसार मुंबई इलाख्यात विशेषत: महाराष्ट्रात जमिनीचे वारसाहक्काने लहान लहान तुकडे बनत चालले होते. जमिनीचे वैयक्तिक व राष्ट्राच्या हिताने हे लहान लहान तुकडे होणे अनिष्ट आहे, असे शासनाचे मत होते परंतु वास्तवात जमिनीचे मोठमोठेभाग मोठमोठ्या भांडवलदार मंडळींना विकत साखरेचे कारखाने संयुक्त भांडवलाच्या जोरावर चालविण्याचा सरकारचा उपक्रम चालू होता."[६] ही वास्तविक स्थिती हे बील विधिमंडळात आणण्यापाठीमागे होती. या संकल्पित बिलाला विरोध करण्यासाठी पुणे येथे मुंबई इलाखा शेतकरी परिषद दि.२५ व २६ जुलै १९२८ रोजी भरविण्यात आली होती. याच वेळी महर्षि वि.रा. शिंदे ब्राह्म समाजाच्या शतसंवत्सरीसाठी बंगालच्या दौऱ्यावर निघाले होते. मुंबईत असताना महर्षींना तातडीची परिषदेसंदर्भात तार मिळाली आणि त्यांनी या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवून या विधेयकाच्या विरोधात शेतकऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम केले.


Scanned by CamScanner

या परिषदेच्या मंचावरून महर्षि वि.रा. शिंदेंनी या बिलासाठी पर्याय देऊ केला. ते या संदर्भात म्हणाले की, तुकडे एकत्र करण्यासाठी जर लहान लहान शेतकऱ्यांची जमीन घ्यावयाची असेल तर त्यांना मोबदला पैशाने न देता मोठमोठ्या तुकड्यांच्या मालकांकडून काही भाग घेऊन तो त्या लहान शेतकऱ्याला देण्याची का व्यवस्था नसावी? अशी दुहेरी व्यवस्था झाल्यास पैशाचा मोबदला कोणासही द्यावा लागून जमिनीची नुसती अदलाबदल मात्र होणार आहे. असे करण्यात अडचण जास्त येईल खरे पण न्यायही जास्त होईल."[७] हा महर्षींनी तुकडेबंदीला पर्याय दिला होता परंतु हा पर्याय सरकार स्वीकारणार नव्हते. कारण सरकार सामान्य शेतकऱ्यांचा विचार करणारे नव्हते तर श्रीमंत भांडवलदार लोकांचा विचार करणारे होते. महर्षि वि.रा. शिंदे कोणत्याही प्रश्नाचा सखोल अभ्यास करीत असत. या तुकडेबंदीसंदर्भातही त्यांनी शेतकी कायद्याचे आंतरराष्ट्रीय एका वार्षिक बुकचा संदर्भ त्यांनी दिला व त्यानुसार स्वीडन, पोलंड, जपान या देशांतील उदाहरणे त्यांनी दिली. या देशांमध्ये कोणतेही सरकार जमिनीच्या तुकड्यांचे एकीकरण जमीन मालकांच्या संमतीविना करू शकत नव्हते. हे दाखले देऊन या बिलाला त्यांनी कडाडून विरोध केला. या "बिलामुळे गरीब शेतकरी भूमिहीन होण्याचा संभव होता. शेतकरी परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून त्या बिलाला महर्षि वि.रा. शिंदे यांनी कडाडून विरोध केला. शेतकऱ्यांचा कौन्सिल हॉलवर मोर्चा नेला व बील रद्द झाले."[८] महर्षि वि.रा. शिंदेंनी शेतकरी चळवळीला दिलेले हे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या पुढाकार व प्रयत्नांमुळे गरीब शेतकऱ्यांवर अन्यायकारक असणारे हे विधेयक सरकारला मागे घ्यावे लागले.

सारावाढीच्या दुसऱ्या विधेयकाच्या संबंधानेही महर्षींनी या परिषदेच्या अध्यक्ष-पदावरून शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण केली. या प्रसंगती ते म्हणाले की, "सारावढीचे जे दुसरे बील आणले आहे ते तर उघड उघड अन्यायाचे व जुलुमाचे आहे. हल्लीचाच सारा देण्याचा त्राण शेतकरी लोकांत उरला नाही. त्यात आणखी जबर भर करावयाची म्हणजे सरकारच्या निष्ठुरपणाची कमालच आहे."[९] अशा शब्दांत त्यांनी या बिलाचा विरोध केला. हे बील सरकार मागे घेत नसेल तर "बार्डोलीप्रमाणे महाराष्ट्रात आणि कर्नाटकातही निवडक तालुके शोधून वेळ पडल्यास सत्याग्रहाची मेढ रोवावी लागेल. सत्याग्रह म्हणजे नुसता तोंडचा शब्द नव्हे. ती कृती आहे आणि तिच्यासाठी अगणित आहुत्या द्याव्या लागतील."[१०] सारावाढीविरोधात सत्याग्रह सुरु करावा लागेल, असा इशाराच



Scanned by CamScanner

जणू या परिषदेच्या मंचावरून त्यांनी दिला. त्यामुळे ही परिषद म्हणजे जणू सरकारच्या अन्यायी कायद्याविरोधात फुंकलेले रणसिंग ठरले. बार्डोलीचे उदाहरण हे उपस्थित शेतकऱ्यांमध्ये उत्साह वाढवणारे होते. गरज पडल्यास या सत्याग्रहासाठी महात्मा गांधीजींचे मार्गदर्शनही शेतकऱ्यांनी घ्यावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले होते.

**शेतकरी संघटनांची आवश्यकता :-**

महर्षि वि.रा. शिंदे यांनी शेतकरी परिषदांमधून मार्गदर्शन करीत असताना शेतकरी संघटनांची आवश्यकता प्रतिपादन केली. या संदर्भात शिंदे लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत ध. रा. गाडगीळ म्हणतात, "शेतकरी वर्गाची व अस्पृश्यांची हीन स्थिती ही त्यांनी जवळून पाहिलेली होती, म्हणून शेतकऱ्यास स्वत:ची आर्थिक व सामाजिक ऊर्फ विधायक घटना करणे हाच आपला मुख्य उद्देश ठेवा आणि त्या कार्याला कोणाचीही वाट न पाहता आपल्या पायावर उभे राहून वागा, असा त्यांनी उपदेश केला."[११] मुळात शेतकरी वर्ग हा विखुरलेला आणि शेतीकाम हे बऱ्याच अंशी असंघटित, हंगामी असल्यामुळे शेतकरी संघटित होणे शक्य नसते; परंतु सरकारच्या शोषणवादी धोरणाविरोधात व भांडवलदारी प्रवृत्तीविरोधात शेतकऱ्यांनी संघटित होणे आवश्यक आहे, असे मत महर्षि वि.रा. शिंदे यांनी प्रतिपादन केले.

तेरदाळ येथील संस्थांनी शेतकरी परिषदेत महर्षि वि.रा. शिंदे यांनी शेतकऱ्यांची हीन स्थिती कशामुळे झाली याची कारणे सांगताना म्हटले की, "साधारणपणे पाहताना जगात कोठेही गेले तरी शेतकरी म्हणजे प्रत्यक्ष शेतात पोटासाठी रात्रंदिन खपणारा रयत हा अनादी कालापासून कंगालच दिसून येत आहे. याची उघड कारणे म्हणजे त्याचा साधेपणा, भोळेपणा व अडाणीपणा हाच होता. या व्यक्तिगत कारणांत संघटनेचा अभाव ह्या सामुदायिक कारणाच्या अलीकडच्या सुधारलेल्या ऊर्फ यांत्रिक युगात भर पडल्यामुळे शेतकरी हा एक कायमच्या गुलामांचा वर्ग बनला आहे."[१२] म्हणून यातून सुटण्यासाठी शेतकऱ्यांच्या संघटना असणे आवश्यक आहे. याबद्दल बोलताना ते म्हणाले की, "शेवटचे आणि खरे काम शेतकऱ्यांनी संघटना करणे हेच आहे. या संघटनेचे सभासद केवळ शेतकरीच पाहिजेत पण त्यांच्यात हिंदू - मुलसमान, ब्राह्मण - ब्राह्मणेतर, स्पृश्य - अस्पृश्य किंबहुना संस्थानिक - खालसातले हे व इतर आगंतुक भेद असावयाचेच... शिवाय द्रव्याची मदत तुम्हाकडूनच पाहिजे. फूल ना फुलाची पाकळी तरी परत करून पडलेल्या शेतकऱ्याला पुन्हा त्याच्या पायावर उभा करा. बळिराजा उभा राहील तरच स्वराज्याची आशा, एरवी सर्व गप्पा."[१३]



Scanned by CamScanner

स्वातंत्र्य चळवळ एकीकडे गतिमान होत असताना महर्षि वि.रा. शिंदेंना दुसरीकडे शेतकऱ्यांचे म्हणजेच बळीचे राज्य यावे असे वाटते. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना आत्मभान देण्याचे आणि तुमच्याच बळावर तुमच्या संघटना उभारा तरच तुमचे राज्य येईल अन्यथा भांडवलदारांची कायमची गुलामी पदरात पडेल, असा इशाराही महर्षि वि.रा. शिंदे यांनी दिला होता. शिवाय "तालुकानिहाय शेतकरी संघ निघाले पाहिजेत. इतकेच नव्हे तर तालुकानिहाय कामकरी संघही निघाले पाहिजे आणि या जोडसंघाचे सहकार्य निरंतर चालले पाहिजे."[१४] शेतकरी संघाची अशी व्यापक साखळी महर्षींना अपेक्षित होती. "शेतकऱ्यांच्या व कामकऱ्यांच्या जोडसंघाच्या वर्षभर घडणाऱ्या सहकार्याविना बहुजन समाज पाठकुळीवर बसून पुन्हा त्यांचेच रक्त शोषणारी जी भांडवलशाही आहे तिला आळा कधी बसणार नाही."[१५] म्हणून शोषणवादी भांडवलशाहीला प्रतिबंध लावण्यासाठी शेतकरी व कामकरी अशा दोन्ही संघटनांचे परस्पर सहकार्य आवश्यक आहे.

शेतकरी संघटनांना मार्गदर्शन करताना संघटनांनी सरकारपासून सावध राहावे सरकार संघटनांच्या कायम विरोधातच असतात. मग ते इंग्रज असोत अथवा भारतीय असणारे संस्थानिक असोत. त्यामुळे शेतकरी संघटनांनी सरकारपासूनच सावधच राहावे, असा सल्लाही महर्षि वि.रा. शिंदे शेतकरी संघटनांना देतात. हे सांगताना ते वारंवार शेतकरी व कामकरी संघटनांना म्हणतात की, "तुम्ही सर्वांनी आपल्यात दुर्भेद एकी करून जमिनीवरील आपली गेलेली सत्ता पुन्हा मिळविली पाहिजे, असे त्यांनी अवाहन केले पण अनेक ठिकाणी त्यांनी ठामपणे सांगितले आहे की, शेतकऱ्यांचा प्रश्न हा पूर्णपणे आर्थिक स्वरूपाचा आहे."[१६] या आर्थिक प्रश्नाकडेच प्राधान्याने लक्ष द्यावे. राजकारण हे गौण आहे. असे असले तरी शेतकरी संघटनांनी आर्थिक प्रश्नांसोबतच राजकारण, सामाजिक सुधारणा, धार्मिकस्वातंत्र्य या सर्वच गोष्टींकडे लक्ष द्यावे लागेल हे सांगायला ते विसरत नाहीत.

शेतकरी संघटनांच्या नेत्यांना संघटना व्यापक बनविण्यासाठी महर्षि वि.रा. शिंदे स्वानुभव सांगताना म्हणतात की, "शेतकऱ्यांना भेटायला जाताना मोटारीतून जाऊ नये. पायी गेले पाहिजे. आम्ही खेडेगावांत इतके फिरलो की अवघा वीस रुपये खर्च झाला...



Scanned by CamScanner

आम्ही पंधरा - वीस मंडळी झेंडा घेऊन प्रत्येक गावी जात होतो. गावात दूध मिळणे मुश्किल होई. खेड्यातील कुणब्याची भाषा आली पाहिजे. खेड्यात पुरुषवर्ग फारसा घरी नसतोच. काही खेड्यात गेलो तो आमच्याभोवती सारी लुगडीच लुगडी दिसू लागली."[३७] अशा परिस्थितीत शेतकरी संघटनांना, शेतकऱ्यांना आपण त्यांच्यापैकीच एक आहोत असे वाटले पाहिजे तर खेड्यापाड्यांतील शेतकरी संघटनेला जोडले जातील, संघटना व्यापक बनेल आणि संघटना व्यापक बनल्यास बळीचे राज्य आल्यावाचून राहणार नाही हा विश्वास त्यांनी शेतकऱ्यांमध्ये निर्माण केला.

**सारांश :-**

महर्षि वि.रा. शिंदे यांनी शेतकरी परिषदा व सभांमधून शेतकऱ्यांमध्ये जागृती घडवून आणण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले. त्यांच्या परिषदांमधील मार्गदर्शनात अस्पृश्य शेतकऱ्यांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाला प्राधान्य देऊन आपल्या गेलेल्या जमिनी मिळवाव्यात, असा उपदेश केला तर मुंबई इलाखा परिषदेतून सरकारच्या विधेयकाविरोधात शेतकऱ्यांना संघर्षासाठी तयार करून सरकारला तुकडेबंदी व सारवाढीचे विधेयक मागे घ्यायला भाग पाडले. अर्थात महर्षि वि.रा. शिंदे यांच्या शेतकरी चळवळीचे हे यश होते. शेतकऱ्यांना त्यांच्या हलाखीच्या स्थितीला त्यांची वैयक्तिक स्थिती कारणीभूत आहे हे सांगतानाच संघटनेच्या अभावामुळेच त्यांचे सरकार व भांडवलदारांकडून शोषण होत आहे. परिणामी त्यांच्या स्थितीत सुधारणा होत नाही हेही स्पष्ट करून सांगितले. शेतकरी वर्गाला संघटित होण्याची आवश्यकता सांगत असतानांच त्यांनी त्यांच्या समवेतच्या कामकरी लोकांच्या संघटनांचे सहकार्य घेण्याचे आवाहन केले. तत्कालीन राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या काँग्रेस पक्षाला व त्यांचे नेतृत्व करणाऱ्या गांधी - नेहरूंना शेतकरी संघटनांनी मदत करावे हे सांगत असतानांच काँग्रेससुद्धा एकाच वेळेला अनेक वर्गाचे हितसंबंध जोपासत असल्याने काँग्रेसकडूनही भविष्यात शेतकऱ्यांना उचित न्याय मिळेल का नाही याबद्दलही महर्षि वि.रा. शिंदे यांनी शेतकऱ्यांना सावध केलेले दिसते. एकंदरीत महर्षि वि.रा. शिंदे यांच्या शेतकरी चळवळीसंबंधीच्या कार्याचे हे वर्णन पाहता शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ते सखोल चिंतनशील वृत्तीने एकरूप होऊन काम करीत होते हे लक्षात येते. महर्षि वि.रा. शिंदे यांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील हे कार्य वर्तमानकालीन शेतकरी चळवळीला वा संघटनांना दिशादर्शक, प्रेरणादायी ठरावे असेच आहे.


Scanned by CamScanner

**संदर्भ :-**

(१) कीर, मालशे आणि फडके (संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, नोव्हेंबर २००६, पृ. २६३.

(२) चव्हाण रमेश (संपा.), महर्षि विठ्ठल रामजी शिंदे एक दर्शन, भाग-२, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान (वाई), पुणे, २००८, पृ. ०१.

(३) पवार गो. मा., महर्षि विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०, पृ. ४४७.

(४) मंगुडकर मा. प. (संपा.), शिंदे लेखसंग्रह, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. २५२.

(५) उपरोक्त, पृ. २९१.

(६) पवार गो. मा., उपरोक्त, पृ. ४४८.

(७) मंगुडकर मा. प. (संपा.), उपरोक्त, पृ. २६०.

(८) चव्हाण रमेश (संपा.), उपरोक्त, पृ. ०५.

(९) मंगुडकर मा. प. (संपा.), उपरोक्त, पृ. २६१.

(१०) उपरोक्त, पृ. २६३.

(११) उपरोक्त, पृ. ०९.

(१२) उपरोक्त, पृ. २७५.

(१३) उपरोक्त, पृ. २८१.

(१४) उपरोक्त, पृ. २९४.

(१५) उपरोक्त, पृ. २९५.

(१६) कदम शंकरराव, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे साहित्य आणि कार्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १९१.

(१७) उपरोक्त, पृ. १८८.

ooo

"इतिहास समग्रतेपासून तुटत चालला आहे."

\- अमोल पालेकर


**UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425**

Scanned by CamScanner